सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५

दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- १११

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.वर्षा अमर निंबाळकर, श्री.उत्तम बाळकृष्ण साखळकर व श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांच्या आरोग्य विषयक सेवांच्या दर्जा मध्ये सुधारणा करण्याकरीता तसेच, पद्मभुषण डॉ.वसंतरावदादा पाटील शासकीय रुग्णालयाप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांच्यासाठी आणखी एखादे सर्वसेवा रुग्णालय उभे करण्यासाठी तत्कालीन उर्वरित वैधानिक महामंडळाचे अध्यक्ष तथा माजी मंत्री स्व.मदनभाऊ पाटील यांनी राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत मा.महाराष्ट्र शासनाकडून १० प्राथमिक आरोग्य केंद्र व १ अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर (यु.सी.एच.सी.) मंजुर करुन त्यास लागणारा आवश्यक निधीही मंजूर करुन तो महानगरपालिकेकडे वर्ग केला असून, मंजूर आरोग्य केंद्रातील सर्व १० प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यात आली असून, ती कार्यान्वीत झाली आहेत. तसेच, सद्या वारणाली कुपवाड येथे अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर उभारण्याचे काम चालू आहे. स्व.मदनभाऊ पाटील यांच्या प्रयत्नातून आज महानगरपालिका क्षेत्रात आधुनिक आरोग्य विषयक यंत्रणा उभी रहात आहे. त्यांच्या या कार्याची स्मृती चिरंतर रहावी या करीता सदर अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर (यु.सी.एस.सी.) ला स्व.मदनभाऊ पाटील मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल असे नामकरण करणेस महापालिका क्षेत्रातील असंख्य नागरीकांची मागणी आहे. यासाठी महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांच्या मागणीचा विचार करता सदर अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर (यु.सी.एच.सी.) ला स्व.मदनभाऊ पाटील मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.उमेश विलास पाटील,सौ.गिता सुयोग सुतार, सौ.सुनंदा चंद्रकांत राऊत व श्री.उत्तम बाळकृष्ण साखळकर यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली वॉर्ड क्र.१७ मध्ये महानगरपालिकेकडून साकारणेत येत असलेल्या नाना-नानी उद्यानाला स्व.बाळासाहेब हरीभाऊ सावंत (आबा) नाना-नानी उद्यान असे नाव देणेबाबत परिसरातील नागरिकांची मागणी केली आहे. स्व.बाळासाहेब हरीभाऊ सावंत (आबा) यांनी सांगली जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाच्या अनेक जेष्ठ नेत्यांसोबत मोठ्या निष्ठेने आणि प्रामाणिकपणे काम केले होते. त्याचप्रमाणे त्यांनी तत्कालीन नगरपालिकेचे नगरसेवक पदही भूषविले होते. त्यांनी विविध सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष,सरचिटणीस अशा महत्वाच्या पदावरही काम केलेले होते. त्यांनी मराठा सेवा संघ या संस्थांना स्व:मालकीची जागा अत्यल्प मोबदल्यात देवून सामाजिक बांधीलकी जपली होती. त्यांच्या या कार्याची स्मृती जपण्यासाठी सांगली वॉर्ड क्र.१७ मध्ये महानगरपालिकेकडून साकारण्यात येत असलेल्या नाना-नानी उद्यानाला स्व.बाळासाहेब हरिभाऊ सावंत (आबा) नाना-नानी उद्यान असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Nimbalkar सौ. वर्षा निंबाळकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.आमिनील भोसले.

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ **दिनांक :-** २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- ११२

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.मनोज रघुनाथ सरगर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील सांगली येथील जुना कुपवाड रोड वरील राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक येथे आश्वारुढ पुतळ्यासह सुशोभिकरण करणेकामी सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकामध्ये लेखाशिर्ष इमारत योजना ई-१०/७६ या लेखाशिर्षावर र.रु.१,००,००,०००/- (रु.१ कोटी) ची तरतुद करणेत आलेली आहे. सदर ठिकाणी पुतळा बसविणेसाठी भागातील नागरिकांचेसह समाज बांधवाची सुद्धा मोठ्या प्रमाणात मागणी होत असल्याने, पुतळा बसविण्यासाठी मा.शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविणे ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.मनगू केरु सरगर यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील कुपवाड कडे जाणाऱ्या रोडवरील राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक सुशोभिकरण करणे व अश्वारुढ पुतळा उभा करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.शासनाच्या मान्यता घेणेसाठी पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. उमेश पाटील

D. P. Surjaram
महापौर,

सांगली मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- ११३

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.आनंदा मारुती देवमाने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज शहरातील मिरज रेल्वे स्टेशन येथील महानगरपालिकेच्या जकात नाक्याची बंद इमारत तसेच लगतच एक अत्यंत जुनी मुतारी असून, ही दोन्ही बांधकामे काही अंशी पडलेली आहेत व मोडकळीस आलेली आहे. सदरचा जकात नाका हा बऱ्याच वर्षापासून बंद असल्यामुळे इमारतीची देखभाल दुरुस्ती न झाल्यामुळे इमारतीचे बांधकाम जिर्ण होवून अर्धे बांधकाम पडलेले आहे तसेच लगतच्या सार्वजनिक मुतारी जवळ सुलभ शौचालय उभारल्यामुळे सदरची जुनी मुतारी वापरात नाही. सदरच्या जकात नाक्याची इमारत व जुनी मुतारी पाडणेबाबत परिसरातील रहिवाशी,व्यापारी,नागरीकांची मागणी होत आहे. तरी सदरची जुनी धोकादायक मुतारी व जकात नाक्याची इमारत पाडणेबाबत प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. उमेश पाटील. D.P. Surjavanshi

महापौर,

सहायक आयुक्त मिरज

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- ११४

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१०(अ) मध्ये माता रमाई आंबेडकर उद्यान ते एम.एस.ई.बी.सबस्टेशन (पुर्व+पश्चिम) ते मनपा शाळा नं.२२ पर्यतच्या जागेवर गुरुवार आठवडा बाजार भरविणेकामी मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान

अनुमोदक :- श्री. उमेश पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Surjavanshi

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- ११५

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रात सद्या कोरोना या साथरोगास सामोरे जावे लागत आहे. सद्यस्थितीस कुपवाड एम.आय.डी.सी. व लगतचे परिसरातील सर्वसामान्य गरीब कामगार मजूर वर्गाची या परिसरामध्ये शासकीय आरोग्य केंद्राची सुविधा नसलेने, आरोग्याच्या दृष्टीने गैरसोय व हेळसांड होत आहे. त्यामुळे परिसरातील गोरगरीब व कामगार वर्गाला वैद्यकिय सेवा सुविधा उपलब्ध होणेकरीता महापालिका कुपवाड विभागाकडील नविन स.नं.१७९ या ओपन स्पेस मध्ये हेल्थ सेंटर (हॉस्पिटल) उभारलेस या परिसरातील गोरगरीब व कामगार वर्गाला याचा फारमोठ्या प्रमाणात लाभ होणार आहे. याबाबींचा विचार करता, कुपवाड नविन स.नं.१७९ या ओपन स्पेस मध्ये हेल्थ सेंटर (हॉस्पिटल)उभारणेस ही सभा मान्यता देत असून, सदर हॉस्पिटल उभारणेकामी येणारा रु.५,५९,०९,०००/- इतका खर्च १४ व्या वित्त आयोगाचे शिल्लक निधी मधून खर्च करणेसाठी मा.शासनाची मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार प्रशासनाने योग्यती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.शेडजी मोहिते. ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

अनुमोदक :- सौ.पद्मजी पाटील. महापौर,

सहा.आयुक्त

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- ११६

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.संदीप सुरेश आवटी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील मिरज वॉर्ड क्र.३ मधील जीजामाता चौक, गोसावी गल्ली,मिरज येथील सुलभ शौचालय पाडणे अत्यंत आवश्यक आहे. सदरचे सुलभ शौचालय हे जुने जीर्ण झालेले असून, धोकादायक बनले आहे. सदर परिसरातील सर्व नागरिकांच्या घरामध्ये शौचालय असलेने सार्वजनिक सुलभ शौचालयाचा वापर होत नाही. त्यामुळे सदर सुलभ शौचालय पाडणेसाठी परिसरातील नागरीक मागणी करीत आहेत. तरी सदर ठिकाणचे सुलभ शौचालय पाडणेबाबत प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.मैनुद्दीन शमशोद्दीन बागवान यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज वॉर्ड क्र.६ मधील ख्वॉजा झोपडपट्टी येथील नाझ हॉटेलच्या मागे जुने शौचालय आहेत. शौचालय हे जुने व जीर्ण झाले असून, धोकादायक बनले आहेत सदर परिसरात नागरिकांच्या घरामध्ये शौचालय असल्याने सार्वजनिक शौचालयाचा वापर होत नाही. खराब झालेले शौचालयामुळे नागरिकांना ये-जा करणेसाठी रस्त्यास अडथळा होत असल्याने शौचालय पाडणेसाठी नागरिकांकडून वारंवार मागणी होत आहे. तसेच, वॉर्ड क्र.६ मधील हजरत ख्वॉजा शमना मिरा रह.दर्गाच्या मागे शौचालय आहेत ते जुने व जिर्ण असून, धोकादायक बनले आहेत. शौचालय वापरात नसल्यामुळे सर परिसरात दुर्गंधी पसरत आहे. त्यामुळे दर्ग्याला येणारे भाविक व तेथील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच तेथे महानगरपालिकेमार्फत नविन शौचालय बांधायचे काम चालू आहे त्यामुळे तेथील नागरिकांकडून शौचालय पाडणेसाठी वारंवार मागणी होत आहे. यासाठी सदर दोन्ही ठिकाणचे खराब झालेले शौचालय पाडणेबाबत प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सहा.आयुक्त (मिरज)

सूचक :- श्री.निरंजन आवटी ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.उमेश पाटील

D.F.Surjavanshi
महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- ११७

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.पद्मश्री प्रशांत पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

हिंदू –मुस्लीम युथ पॉवर कुपवाड हे मंडळ गेली ९ वर्षापासून क्रिडा,सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. मंडळाच्या वतीने जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धा भरविण्यात येतात. त्याचप्रमाणे विविधी सामाजिक व धार्मिक उपक्रम राबविले जातात. कोरोना लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये या मंडळाने सामजिक बांधीलकी दाखवीत नागरिकांना भाजीपाला वाटप केला,मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले. कुपवाड येथील उल्हासनगर भागातील हिंदू-मुस्लीम नागरिक सर्व धर्म समभाव या उद्देशाने बंधू भावाने राहतात त्यामुळे कुपवाड मुख्य चौकातून अहिल्यानगरकडे जाणाऱ्या जनता नागरी पतसंस्थे जवळील चौकास हिंदू-मुस्लिम चौक असे नामकरण करणेबात परिसरातील नागरिकांची मागणी होत आहे. तरी सदर ठिकाणच्या चौकास हिंदु –मुस्लीम चौक असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. मेहबूब जमादार ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. उमेश पाटील

महापौर,

महासचिव

महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- ११८

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.संगिता अभिजीत हारगे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज कृष्णाघाट परिसरातल स.नं.५९३ मधील पंपींग स्टेशन येथील धोकादायक इमारती आहेत. या इमारती विना वापराने जीर्ण झालेल्या आहेत. व त्या इमारती कोसळून मोठी दुर्घटना घडू शकते त्यामुळे त्या जीर्ण झालेली इमारत पाडणे गरजेचे आहे. तसेच, कृष्णाघाट परिसरात नागरिकांसाठी कोणताही बगीचा नाही चांगल्या आरोग्यासाठी ओपन जीम व मोठे प्ले ग्राऊंड नाही. ह्या गोष्टीसाठी नागरिकांकडून वारंवार मागणी होत आहे. तरी मिरज कृष्णाघाट येथील जीर्ण झालेली इमारत पाडून झालेल्या मोकळ्या जागेवर नागरिकांसाठी बगीचा व ओपन जीम करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मी.मैनुद्दीन बागवान

अनुमोदक :- मी.उमेरा पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- ११९

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.स्नेहल सचिन सावंत यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.१८ मधील शामराव नगर परिसरातील इनामधामणी लगत परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर रहिवाशी भाग विकसीत झालेला असून, सदर परिसरात अद्याप कोणतीही विशिष्ठ ओळख अथवा नाव नसल्यामुळे नागरिकांना त्यांचे दैनंदिन व्यवहार करणेस अडचणी येत आहेत. त्यामुळे सदर परिसराचे तिर्थकर कॉलनी असे नामकरण करणेबाबत परिसरातील नागरिकांच्या मागणी केली आहे. तरी सदर ठिकाणी नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नसीमा गैबीसो नाईक

सूचक :- N.G.Naik ठराव सर्वानुमते मंजुर

D Suryavanshi

अनुमोदक :- श्री.उमेश पाटील महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका